HIREKHAN/BHUJI/४६५-४७०/२८.७.२००८

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८९७/२००७.

श्री. देवमन सखाराम तायडे,
मु. निलकंठ नगर, चिखली रोड,
ता. खामगांव, जि. बुलढाणा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
सहाय्यक धर्मदाय आयुक्त,
जि. बुलढाणा.

श्री. सुधाकर रामचंद्र अजबे
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, टिळक राष्ट्रीय विद्यालय,
खामगांव, जि. बुलढाणा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.७.२००८)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री.धोत्रे, लघुलेखक हे हजर आहेत. माहिती अधिकारी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२००६ रोजी सचिव, टिळक राष्ट्रीय विद्यालय, खामगांव, जि.बुलढाणा यांच्याकडे राज्य शासकीय माहिती अधिकारी म्हणून विश्वस्त मंडळाच्या मिटींगबाबत "माझ्या निलंबनाच्या विश्वस्त मंडळाच्या ठरावाची संपूर्ण माहितीची नक्कल व विश्वस्त मंडळाच्या नावाची नोंदणीकृत यादी मिळावी. तसेच अपीलीय अधिकाऱ्यांचे नांव व पत्ता. माहिती स्वतः घेण्यास बोलाविलेल्या तारखेस येणार. अर्जदाराचे पत्त्यामध्ये दुरध्वनी क्रमांक २५९४२४ दिलेला दिसून येतो. सदरच्या अर्जाप्रमाणे विहित

... २



मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांनी दिनांक १२.१२.२००६ रोजी अपीलकर्ता यांनी धर्मदाय आयुक्त कार्यालय, बुलढाणा यांच्याकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.१.२००७ रोजी देण्यात आला असून अपील मंजूर करण्यात आलेले दिसून येते. त्यामध्ये सामनेवाला अध्यक्ष, टिळक राष्ट्रीय विद्यालय, खामगांव यांना सूचित करण्यात येते की, त्यांचे दप्तरी उपलब्ध असलेली माहिती ताबडतोब अपीलकार यांना पुरविण्यात यावी. अपीलकार यांना सूचित करण्यात येते की, नियमानुसार आवश्यक असलेली फी त्यांनी सामनेवाला यांचेकडे भरावी. अशा प्रकारचा आदेश देण्यात आलेला दिसून येतो. त्यानंतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३.	अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.११.२००६ च्या अर्जान्वये मागितलेल्या निलंबनाच्या विश्वस्त मंडळाच्या ठरावाची नक्कल ही त्यांना दिनांक २०.११.२००६ रोजी दिलेल्या आरोपपत्रात दिला आहे असा खुलासा संस्थेचे सचिव तथा माहिती अधिकारी यांनी सहाय्यक धर्मदाय आयुक्त, बुलढाणा यांच्याकडे केलेला होता. तरीसुध्दा माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहे असे सचिव तथा माहिती अधिकारी यांनी सांगितले व त्याकरिता अपीलकर्ता यांना बोलाविले होते परंतु ते आले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना माहिती अधिकारी यांनी बोलाविले नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे संयुक्तिक वाटते. कारण माहिती उपलब्ध करुन देण्यास बोलाविले असते तर आरोपपत्रामध्ये विश्वस्त मंडळाच्या ठरावाची नक्कल दिलेली आहे असा खुलासा करण्याची आवश्यकता नव्हती. प्रथम अपीलाचे निर्णयात सुध्दा माहिती उपलब्ध करुन द्यावी परंतु फी भरुन उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम न प्रमाणे माहिती जर विहित मुदतीत उपलब्ध करुन दिली नसेल तर ती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी अशी तरतुद आहे. तरीसुध्दा विहित मुदतीच्या नंतर प्रथम अपील दाखल झाल्यावर सुध्दा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी फी भरुन माहिती उपलब्ध करुन द्यावी हे आदेश कोणत्या आधारावर दिले हे कळावयास मार्ग नाही. त्याबद्दलचे निर्णयामध्ये कोणत्याही प्रकारचे विवेचन दिसून येत नाही. आरोप पत्रामध्ये विश्वस्त मंडळाच्या ठरावाची नक्कल उपलब्ध करुन दिलेली आहे ही बाब

... ३



अपीलकर्ता यांना मान्य आहे. परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना इतिवृत्ताचे रजिस्टर मधील सर्व उपस्थितांच्या सहीत ठरावाची नक्कल अपेक्षित आहे. आरोप पत्रासोबत फक्त सुचक व अनुमोदक यांनी दिलेला ठराव ऐवढेच नमुद केलेले आहे. उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांची नावे पण त्यात नांव नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही हा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, सदरची माहिती उपलब्ध करुन दिली असती तर त्यांना शालेय न्यायाधिकरणाकडे कागदपत्रे दाखल करता आली असती व ती दाखल न केल्यामुळे सदरचा निर्णय त्यांचे विरुध्द गेलेला आहे व त्यामुळे त्यांना त्यांचे जे नुकसान झाले आहे त्याबद्दलची नुकसान भरपाई मिळावी अशी त्यांची मागणी आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये उच्च न्यायालयातून निलंबनाला स्थगिती आणू शकलो नाही. माझे आजपर्यंतचे आर्थिक नुकसान अंदाजे ६०,०००/- रुपयांचे झाले आहे आणि पुढे नुकसानीचे पर्व सुरुच राहणार आहे. कारण माहे नोंव्हेंबर २००६, डिसेंबर २००६ आणि जानेवारी २००७ चा पगार अद्याप झाला नाही व इतरही विषयी त्यांना नुकसानीचे संदर्भ केलेले दिसून येते त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या निलंबनाच्या विश्वस्त मंडळाच्या ठरावाची संपूर्ण माहितीची नक्कल व विश्वस्त मंडळाच्या नावाची नोंदणीकृत यादी ही उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांचे म्हणणे असे आहे की, विश्वस्त मंडळाच्या ठरावाच्या माहितीची नक्कल याचा अर्थच त्यांनी आरोपपत्रासोबत पुरविण्यात आलेली नक्कल असा होतो. परंतु अपीलकर्ता यांनी इतिवृत्ताचे रजिस्टरमधील सूंपर्ण इतिवृत्ताचा अहवाल असलेल्या सर्व सदस्यांची सही असलेली माहिती अपेक्षित आहे. त्यांना त्या माहितीची आवश्यकता आहे त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.११.२००६ च्या अर्जातील त्यांच्या निलंबनाच्या विश्वस्त मंडळाच्या ठरावाची संपूर्ण माहितीची नक्कल इतिवृत्ताच्या रजिस्टरमधील विश्वस्त मंडळाच्या इतिवृत्ताची उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांच्या सहया सहीत विश्वस्त मंडळाच्या नावाची नोंदणीकृत यादी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोष्टाने अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा सचिव टिळक राष्ट्रीय विद्यालय, खामगांव यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.११.२००६ च्या अर्जातील मागितलेल्या माहितीच्या प्रमाणे माहिती त्यांना अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाचे कलम २० प्रमाणे ते दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये १०,०००/- शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची रक्कम त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

३) अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ९.११.२००६ च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे त्यांना मा.उच्च न्यायालयामध्ये तसेच शालेय न्यायाधिकरणामध्ये कागदपत्रे दाखल करता आली नसल्यामुळे रुपये ५,०००/- ची नुकसान भरपाई संस्थेने हा निर्णय झाल्यापासून द्यावी.

४) सदरच्या निर्णयाची एक प्रत सहाय्यक धर्मदाय आयुक्त, बुलढाणा विभाग, बुलढाणा यांच्याकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

५) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर** **(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**दिनांक :- २८.७.२००८** **विदर्भ क्षेत्र, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, विदर्भ क्षेत्र, नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १८१९/२००७.

सौ. मलेका तरन्नुम रिजवान खान,
वार्ड क्रमांक १६, (नविन) मक्का मस्जिद जवळ,
लक्ष्मीनगर, जुने शहर, अकोला - ४४४ ००२. **..... अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

डॉ. जी. पी. राणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा,
जिल्हा उपायुक्त, पशुसंवर्धन,
जि. अकोला.

डॉ. निता गोडबोले,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन
विभागीय रोग अन्वेषण प्रयोगशाळा,
जि. अकोला. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.७.२००८)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.७.२००८ रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हजर आहेत.